dr. Sangita Jangid

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**January- 2024**

ISSUE No - (CDLIII) 453-A

# Social Problems in India




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive-Editors**
Dr. Rajkumar H. Mhaske
Principal
Jalna College of social work , Jalna

**Editor**
Dr. Renuka D. Badwane-Bhavsar
Jalna College of social work , Jalna

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLIII) 453-A
ISSN : 2278-9308
January 2024

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्रातील सामाजिक प्रक्रियेत वृध्दांचा सहभाग : एक अभ्यास<br>प्रा. ढोबळे गोविंद नागनाथराव , प्रा. डॉ. ए. टी. शिंदे | 1 |
| 2 | शेतकरी आत्महत्या<br>श्री.प्रा.डॉ.व्यंकटेश खरात | 8 |
| 3 | भारतातील दिव्यांग व्यक्तीच्या सामाजिक समस्या<br>अशोक संजाब वाठोरे , प्रा. डॉ. बालाजी पी. मुंडे | 11 |
| 4 | भारतातील बेकारीची समस्या एक संक्षिप्त आढावा<br>डॉ. जांगिड संगीता रामेश्वरलाल | 15 |
| 5 | सायबर गुन्हेगारी - विद्यार्थिनी समोरील आव्हाने<br>अविनाश गेडाम, पुष्पलता तोताराम भारसाकडे | 18 |
| 6 | किशोरवयीन मुले आणि मोबाईल एक चिकीत्सक अभ्यास<br>बाबासाहेब एल. डोंगरे, डॉ. नरसिंग पवार | 25 |
| 7 | वृध्दांना समायोजन करतांना येणा-या समस्या<br>प्रा.डॉ. सुनिता प्रमोद चौधरी | 29 |
| 8 | हुंडा एक सामाजिक समस्या<br>डॉ.प्रवीण बबनराव आहेर | 33 |
| 9 | बेकारी<br>हनुमान अशोकराव रासवे,प्रा. डॉ. दिपक मोहनराव बुक्तरे | 37 |
| 10 | भारतातील हुंडा पद्धती व त्यावरील प्रतिबंधात्मक तरतुदीचे अध्ययन<br>प्रा. डॉ. दिलीप घोंगडे | 42 |
| 11 | महिला सक्षमीकरण: प्रगती आणि समानतेसाठी एक उत्प्रेरक<br>प्रा. डॉ . प्रेमसिंग प्र. जाधव | 50 |
| 12 | स्पर्धा परीक्षा - स्वप्न आणि वास्तव<br>राजेश चंद्रकांत शिंदे, प्रा. डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | 54 |
| 13 | सायबर क्राईम : प्रकार, कारणे व उपाय योजना<br>डॉ. शिंदे मीनाक्षी प्रल्हादराव | 59 |
| 14 | दारिद्रय निर्मूलनात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची भूमिका<br>तुकाराम बाबासाहेब पिठोरे,डॉ.प्रकाश तुकाराम शिंदे | 64 |
| 15 | महिलांवरील कौटुंबिक अत्याचार : कारणे, परिणाम आणि उपाय<br>जयश्री पंडितराव पोटपल्लेवार | 69 |
| 16 | मराठी साहित्य आणि वृद्धांच्या समस्या<br>प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 73 |
| 17 | समाजावर सोशल मीडियाच्या सकारात्मक आणि नकारात्मक प्रभावांचा अभ्यास<br>डॉ. फरिदा शफीक खान | 78 |

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLIII) 453-A
ISSN : 2278-9308
January 2024

# भारतातील बेकारीची समस्या एक संक्षिप्त आढावा

डॉ. जांगिड संगीता रामेश्वरलाल
अर्थशास्त्र विभाग प्रमुख नूतन कला महाविद्यालय राजापूर.

**प्रस्तावना :**

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात अगत्याचे झालेले आहे . कारण भारतातील सामाजिक प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहेत. सामाजिक समस्या या मानवनिर्मित असतात. भारतातील बहुतांशी सामाजिक समस्या भारताच्या गुंतागुंतीच्या समाजरचनेमुळेच निर्माण झालेल्या दिसून येतात. सामाजिक समस्या मानवी समाजाइतक्याच प्राचीन आहेत. मानवी समाजाच्या प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्यांचे अस्तित्व दिसून येते. या संदर्भात भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केला तर प्रत्येक कालखंडात निरनिराळया स्वरूपाच्या सामाजिक समस्यांचे अस्तित्व दिसून येते. सामान्यपणे समाजातील बहुसंख्य लोकांच्या समस्या म्हणजे सामाजिक समस्या होय. उदा. गरिबी, बेकारी हे प्रश्न समाजातील बहुसंख्य लोकांना भेडसावत आहे .

मानवी समाजातील असा कोणताच कालखड नाही की, ज्या कालखंडामध्ये समाजापुढे आव्हाने नाहीत. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे प्रत्येक कालखडात कोणतीना कोणती आव्हाने समाजापुढे दिसून येतात . 19 व्या शतकात कितीतरी आव्हानाना भारतीय समाजाला सामोरे जावे लागले आहे . आजच्या परिस्थितीत काही नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत यामध्ये बेरोजगारी हे एक अत्यंत गंभीर असे सामाजिक आव्हान आहे.

स्पर्धेत टिकून राहावयाचे तर नव्या रीतीचा स्विकार करीत उद्योगातील जुनी तंत्र बदलावी लागते मोडीत काढावी लागते. जुन्या व्यवस्थेला साजेसा कामगार नव्या व्यवस्थेला जड होतो. काढून टाकावा लागतो. उद्योगातील संरचनेचा परिणाम बेकारी येण्यावर, वाढण्यावर होतो. काही उद्योगातून कामगार कपात अपरिहार्य बनते व येथेच बेरोजगारी समस्येचा जन्म होता.त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंध बेकारी या समस्येचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे :**

1) भारतातील बेरोजगारीचे प्रमाण अभ्यासणे
2) बेकारीची संकल्पना अभ्यासणे
3) बेकारी निर्माण होण्याची कारणे अभ्यासणे

**संशोधन विषयाची गृहीतकृत्य :**

1) बेकारी ही एक सामाजिक समस्या आहे.
2) भारतात बेकारीचा दर हा वाढत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ नियतकालिके, मासिके, भारताचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल व तज्ज्ञांचे शोध निबंध इत्यादी मधून माहितीचे संकलन करून प्रस्तुत लेख तयार करण्यात आला.

**बेकारी या संज्ञेचा अर्थ**

बेकरीचा अर्थ अनेक प्रकारे घेतला जातो. सामान्यपणे बेकार हा शब्द नोकरीचा अभाव या अर्थाने वापरला जातो. जर हा अर्थ घेतला तर काम करण्याची इच्छा नसणारे, आजारपणामुळे कामावर जाऊ न शकणारे, संपावर गेलेले ज्यांना नोकरी किंवा काम देणे न देणे अशा विविध दृष्टीकोनांचा विचार करावा लागेल. त्यामुळे अर्थ समजून घेताना अनेक प्रकारचा ग ोंधळ निर्माण होऊ शकतो. वैज्ञानिक दृष्टीने बेकार या शब्दाचा अर्थ काम करण्याचे वय, इच्छा असणारे, धडधाकट व्यक्ती, योग्य वेतनावर नोकरी न मिळणे शारीरिक व मानसिक दोषांमुळे नोकरी किंवा काम करण्याची इच्छा नसणारे, आजारपणामुळे कामावर जाऊ न शकणारे, संपावर गेलेले, ज्यांना नोकरी किंवा काम देणे न देणे अशा विविध दृष्टीकोनाचा विचार करावा लागेल. त्यामुळे अर्थ समजून घेतांना अनेक प्रकारचा ग ोंधळ निर्माण होऊ शकतो. एकसंघ व्याख्या करणे अवघड आहे.

**बेकारीची व्याख्या :**

"बेकारी म्हणजेएखाद्या व्यक्तीची काम करण्याची इच्छा आणि कुवत असून देखील त्याला जर काम मिळत नसेल तर ती व्यक्ती बेकार आहे असे म्हटले जाते. "

**भारतातील बेकारीचे प्रमाण :**

| अ.न | वर्ष | बेरोजगारी |
|---|---|---|
| 1 | 1993-94 | 7.49 |
| 2 | 1999-2000 | 8.97 |
| 3 | 2004-2005 | 11.17 |
| 4 | 2009-10 | 9.84 |
| 5 | 2011-12 | 10.84 |

यावरून असे दिसते की. 1993-94 च्या तुलनेत 2011-12 मध्ये बेरोजगारीच्या दरामध्ये वाढ झालेली दिसून येते. 1993-94 मध्ये भारतातील बेरोजगारी दर 7.49% होता.. तर 2011 मध्ये भारतातील बेरोजगारी दर 10.84% पर्यंत वाढलेला दिसतो यावरून आपणास असे म्हणता येते की भारतामध्ये बेरोजगारीमध्ये सतत वाढ होत आहे.

**बेरोजगारीची कारणे :**

**1) लोकसंख्यावाढ :**

देशात विकासासोबतच नोकऱ्या व रोजगाराचे प्रमाण सतत वाढत असले तरी तुलनेने लोकसंख्या वाढीचे प्रमाण खूपच जास्त आहे. खेड्यात व्यवसाय वा कामधंदा मिळत नसल्याने असंख्य लोक अ शहरात स्थायिक होण्याचा प्रयत्न करीत आहेत. शहरात उद्योगधंद्याचे प्रमाण वाढत असले तरी त्या प्रमाणात वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध नोक-याच्या प्रमाणात अतिरिक्त लोक असल्याने अनेक कुशल, अकुशल, शिक्षित, अशिक्षित लोकांना निवळ बेकारीचे जीवन जगावे लागत असते.

**2) शिक्षण विस्तार :**

सरकारने नियोजन काळात शिक्षण विस्तारास आग्रक्रम दिला. शहरी व ग्रामीण भागात महाविद्यालयाची संख्या वाढत गेली त्यामुळे सुशिक्षिताची प्रचंड फौज तयार झाली. पदवी घेणाऱ्याची संख्या वाढली परंतु त्या प्रमाणात त्यांना सामावून घेण्याच्या सदर्भात कोणत्याही संधी उपलब्ध होत नाहीत. वाढत्या शिक्षण प्रसारामुळे स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले व पर्यायाने सुशिक्षित स्त्रियांची संख्या देखील वाढत आहे.

**3) स्वयंरोजगाराच्या अपुऱ्या सोयी :**

स्वयंरोजगार म्हणजे स्वतः चा रोजगार स्वतः शोधून काढणे होय. सुशिक्षित बेरोजगाराना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अधिक सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**4) सरकारी नियोजनाचा अभाव :**

सरकार पंचवार्षिक योजना आखत असते. या योजना आखत असताना भविष्यात आपल्या देशात किती रोजगार निर्माण होणार आहे याचाही विचार करावा लागतो. परंतु नवीन निर्माण होणाऱ्या श्रमशक्तीसाठी कोणकोणत्या उद्योगांना चालना द्यावी लागेल व श्रमिकांना किंवा नवीन रोजगाराला कसे सामावून घेता येईल याबाबतचे धोरण व प्रत्यक्ष कार्यवाही यात मात्र तफावत दिसून येते. प्रत्यक्ष नियोजन केले जात नाही. सरकार फक्त आश्वासन देते. अंमलबजावणी मात्र पूर्ण केली जात नाही, यामुळेही बेकारीचे प्रमाण वाढत आहे.

**5) कुटीर उद्योगधंद्यांचा नाश :**

प्राचीन काळापासून भारतात कुटीर उद्योग जगप्रसिद्ध होता व जगात भारतातील निर्माण होणाऱ्या वस्तूंना मागणी होती. कुटीर उद्योगात अनेक व्यक्तींना काम मिळत होते.. परंतु औद्योगिकीरणाचा विकास झाला तसे कुटीर उद्योगांचा -हास व्हावयास लागला. आधुनिक काळात अनेक वस्तूंचे उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होत असल्यामुळे यंत्राच्या सहाय्याने उत्पादीत होणाऱ्या वस्तूबरोबरच्या या स्पर्धेत ग्रामीण कुटीर उद्योगातील वस्तू टिकाव धरू शकत नाही. परिणामी भारतातील अनेक कुटीर उद्योग बंद पडलेत. परंपरागत उपजिविकेचे साधन नाही व नवीन कारखाना पद्धतीत काम करण्याची पात्रता नाही त्यामुळे अनेक व्यक्तींवर बेकार राहण्याची वेळ आहे.

**6) दोषपूर्ण किंवा सदोष शिक्षण पद्धती :**

भारताला स्वातंत्र्य मिळवून आज जवळपास ६५ वर्षे पूर्ण झालीत तरीसुद्धा भारतातील शिक्षण पद्धतीत फार बदल झालेला नाही. शिक्षण प्रक्रियेत व्यावसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षणाला अजूनही फारसे विशेष स्थान मिळालेले

दिसत नाही. परंपरागत शिक्षण पद्धतीत शारीरिक कष्ट करण्याची तयारी केली जात नाही. औपचारिक शिक्षण घेतलेली व्यक्ती शारीरिक कष्ट करण्यास तयार होत नाही. दिले जाणारे शिक्षण हे तात्विक स्वरूपाचे आहे.. त्याला व्यवहाराची जोड नाही यामुळे शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यक्तींच्या अंगी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची कुवत येत नाही. बहुतेक व्यक्तींचा शिक्षणाचा उद्देश नोकरी करणे हाच असतो. त्यांना विशिष्ट प्रकारच्या नोकऱ्यांवर अवलंबून राहावे लागते व अशा नोकऱ्यांचे प्रमाण कमी आहे. इतर क्षेत्रात मात्र हे शिक्षित व्यक्ती बेकार राहतात. शिक्षित व्यक्तीला एखादा धंदा करणे कमीपणाचे वाटते. त्यामुळे अनेकांवर बेकार राहण्याची वेळ येते. परिणामी बेकारीत वाढ होत जाते.

**संदर्भ सूची:**

1) देशपांडे श्रीधर आत्माराम, भारताचे आर्थिक प्रश्नह हिमालया पब्लिशिंग हाउस मुंबई पृ.क्र.444
2) मोड़के आर.एम. ककडे व्ही. बी. (2003) भारतीय अर्थशास्त्र श्रीविद्या प्रकाशन पुणे, पृष्ठ.255
3) देसाई श्री. मु., भालेराव निर्मलङ (२००४) भारतीय अर्थव्यवस्थाच निराले पुणे पृ.क्र.515
4) राजेंद्र फकीरराव बगाटे,बेरोजगारी एक सामाजिक आव्हान,रिसर्च जौर्नल 2015
6)संकेतस्थळे

Karmaveer Pratishthan's Jalna

# Jalna College of Social Work, Ramnagar, Jalna

NAAC Accredited with ' B ' Grade

**One Day National Conference 16 January 2024**

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chattrapati Sambhajinagar

## " Social Problems in India "

# Certificate

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs.* Sangita Rameshwarlal Jangid

*of* Nutan Arts College, Rajapur, Tal- Sangamner Dist- A. Nagar *Has attended/Participated of as a Resource person / Chairperson / Delegate / Guest of Honour / Presented a Paper entitled* "A brief overview of the problem of unemployment in India"

*in one day National Conference on* **" Social Problems in India "**

*held on 16th January 2024*

| Dr. Renuka D. Badvane (Bhavsar) | Dr. Narsing A. Pawar | Dr. Deepak M. Buktare | Dr. Rajkumar Mhaske |
|---|---|---|---|
| Convener | Convener | Convener | Principal |

AnyScanner